प्रेस नोट दिनांक - १०/०८/२०२६

**अमुल दुध या नामांकित कंपनीच्या बनावट दुध पिशव्या तयार करणार-या कारखान्यावर छापा टाकुन दुधामध्ये भेसळ करुन नागरीकांची फसवणुक करणाऱ्या इसमांना गुन्हे शाखेने जेरबंद केले बाबत**

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष १२, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुअवि., दहिसर पुर्व मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा., गु.र.क्रं. ७७/२०२६ क. २७४, ३४५(३), ३४७(१), ३१८(४), ३३६(३), ३(५) भा.न्या.सं. सह क. २६, २७, ३१, शिक्षा क.५९ व ६३ अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमन २०११ (दहिसर पोलीस ठाणे गुरक्र. १०१२/२०२६ |
| गुन्हा घडला दि. व वेळ | दिनांक ०९/०७/२०२६ रोजी ०४.४५ वा. ते ०९.१० वा. |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक ०९/०७/२०२६ रोजी १३.०१ वा. |
| घटनास्थळ | आर.एन. ०८८/३९, रूम नंबर बी-३, दुबे चाळ नंबर ०२, राजेश कंपाउंड जवळ दहिसर पूर्व, मुंबई |
| अटक आरोपींची संख्या | ०४ पुरुष आरोपी |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | १) अमुल, व गोकुळ या नामांकीत कंपन्यांचे २९,७५०/- रु किं. चे एकुण ४७० लिटर दुध<br>२) अमुल कंपनीच्या १३,००० बनावट रिकाम्या पिशव्या व प्लॅस्टीक साहित्य,<br>३) दुध भेसळ करणे करिता आवश्यक असलेली साधन सामुग्री<br>४) नांमाकित कंपन्याचे बनावट पिशव्या बनविण्याकरीता लागणारे मशिन व इतर साहित्य, अं.कि. १०,००,०००/-<br>५) ०४ पुरुष आरोपीतांचे ०४ मोबाईल फोन, अं.कि.४०,०००/-<br>एकुण मालमत्ता :- १०, ७९,७५०/- |

दहिसर हद्दितील एक इसम नामांकित दुध कंपन्यांच्या दुधाच्या पिशवीत अस्वच्छ पाणी मिसळुन ते भेसळ युक्त दुध नागरीकांना वितरीत करत असलेबाबत कक्ष १२, गुन्हे शाखा मुंबई यांना गोपनिय माहिती मिळाली होती. त्यावरून दिनांक ०९/०७/२०२६ रोजी कक्ष-१२ च्या पथकाने दहिसर पूर्व, मुंबई याठिकाणी छापा टाकला असता, नमुद ठिकाणी नामांकित अमुल गोल्ड, अमुल (ताजा) व गोकुळ कंपन्याच्या मुळ पिशव्या कात्रीने कापून त्यामधिल दुध काही प्रमाणात बाहेर काढून त्यामध्ये अस्वच्छ पाणी मिसळुन, त्या दुधाच्या पिशव्या पुन्हा सिल करुन ते नामांकित कंपन्यांचे प्रमाणित दुध आहे असे भासवुन सामान्य नागरीकांची फसवणुक करुन विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या इसमास भेसळयुक्त दुध व दुध भेसळी करीता वापरण्यात आलेल्या साहित्यासह ताब्यात घेतले. नमुद इसमाविरुध्द वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयामध्ये अशाप्रकारचा दुधाची भेसळ व दुध प्लॅस्टीक पिशवीची विक्री करणारे अशा ०२ इसमांना ताब्यात घेण्यात आले.

त्यानंतर अटक करण्यात आलेल्या दोन आरोपीकडे तपास करून गुन्हयातील मुख्य आरोपी निष्पन्न करून त्यास **तेलंगणा येथून अटक करण्यात आले**. त्याच्याकडे तपास करून **लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट समोर, बाबुभाई शहाणी कंपाऊंड, वाळीव फाटा, वसई पूर्व, जिल्हा पालघर** येथे छापा कारवाई करून **अमुल दुध या नामांकित कंपनीच्या बनावट पिशव्या तयार करणार-या कारखान्यावर छापा टाकला**. त्यामध्ये अमुल कंपनीचे बनावट छापे व अमुल दुध भेसळ करीता बनावट दुध पिशव्या तयार करण्याकरीता वापरात असलेले मशिनरी अंदाजे कींमत १० लाख रु किमतीचे ताब्यात घेण्यात आले आहे. सदर मुख्य आरोपी हा सन २०२१ पासून मुंबई व मुंबई उपनगर मध्ये दूध भेसळ करिता आवश्यक असलेल्या बनावट पिशव्या विक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. नमुदच्या गुन्हयात एकुण ४ आरोपींना अटक करण्यात आली असुन दुध भेसळीच्या प्रकरणात करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान तपासाची पाळेमुळे शेवटपर्यंत जाउन शोध घेण्यात आला. त्यातून बनावट दूध पिशव्यांमध्ये भेसळयुक्त दूध तयार करून विक्री करणाऱ्या संपूर्ण यंत्रणेला उध्दवस्त करण्यात गुन्हे शाखेस यश आले आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त( गुन्हे ) श्री अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ) श्री कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त ( प्रकटीकरण-१ ) श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी- उत्तर) श्री. सदानंद राणे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप येडे-पाटील, पोनि बाळासाहेब राऊत, पोनि पुजा खांडेकर, पोनि विजय रासकर, सपोनि समीर मुजावर, सपोनि युवराज चव्हाण, पोउनि किरण कोते, पोउनि अजय सावंत व कक्ष - १२ येथिल पोलीस पथक यांनी पार पाडलेली आहे.